# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २२/०८/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### गोंडखैरी पारधी बरड येथील अवैध्य दारू भट्टीवर छापे १०,००,००० रूपयाचा मुद्देमाल जप्त, पोळा पाडवा सणाच्या अगोदरच कळमेश्वर पोलिस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची संयुक्त प्रतिबंधक कारवाई

दिनांक २६/०८/२०२२ रोजी पोळा सण साजरा होत असून दुसऱ्या दिवशी पाडवा निमित्त मोठया प्रमाणात अवैध दारू विक्री होण्याची शक्यता असते. त्यासाठी अवैध दारू निर्मिती देखील मोठया प्रमाणात होण्याची शक्यतर असल्याने कळमेश्वर पो.स्टे हद्दीतील गोंडखैरी येथील पारधी बरड येथे मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून आजुबाजुचे परिसरात विक्री करणार असल्याची गोपनीय खबर कळमेश्वर पोलिसांना मिळाल्याने मा.पोलिस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, पोलीस उपविभागीय पोलिस अधिकारी श्री अजय चांदखेडे यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पोलिस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे तसेच पोलिस स्टेशन कळमेश्वर चे प्रभारी अधिकारी श्री आसिफराजा शेख यांचे नेतृत्वाखाली आज दि. २२/०८/२०२२ रोजी पहाटे ०५.३० वा. सुमारास पोलिस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील गोंडखैरी पारधी बरड येथे सुरू असलेल्या अवैध दारू भट्टीवर छापे मारून एकुण कि. १०,००,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून एकुण ०८ आरोपीतांवर पोलिस स्टेशन कळमेश्वर येथे गुन्हे दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे. कारवाई दरम्यान एकुण ८००० लिटर कच्चे रसायन सडवा २१० लिटर तयार दारू जप्त करण्यात आली असून दारूभट्टी साठी लागणारे एकुण ४५ ड्रम, घमेले व दारू तयार करणेकामी लागणारे साहीत्य जप्त करून गावठी दारूच्या भट्टया उद्धवस्त करण्यात आल्या आहे.

सदरची कारवाईसाठी सपोनि मनोज खडसे, मेश्राम, पोउपनि मुंडे, गायकवाड, मपोउपनि गेडाम, ग्रेड पोउपनि हिवरकर, पाली, नागपूर, सफौ मन्नान नोरंगाबादे, पोहवा प्रकाश उईके, पोना गणेश मुदमाळी, निलेश उईके, श्रीकात बोरकर, रवी मेश्राम, पोशि राणासिंग ठाकुर व कळमेश्वर पोलिस स्टेशन इतर अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील सपोनि राजीव कर्मलवार व इतर कर्मचारी यांचे पथकाने पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर